## चित्रपट - वावटळ

निर्माते ना बा कामत यांनी त्यावेळचे प्रसिद्ध ग्रामिण कथालेखक शंकर पाटील यांच्या एका कथेवर तमाशा नसलेला ग्रामिण चित्रपट तयार करण्याची योजना आठवले यांच्यासमोर ठेवली. आठवले यांनी फिल्म्स डिव्हिजन सोडली आणि ती जबाबदारी स्वीकारली आणि ती अशी काही पार पाडली की त्यांनी त्या कथेवर तयार केलेल्या 'वावटळ' या चित्राला पु.ल.देशपांडे, गजानन जहागीरदार आणि विश्राम बेडेकर यांसारख्या दिग्गजांनी १९६५ - १९६६ सालच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा मान दिला. महाराष्ट्र सरकारतर्फे दिल्या जाणाऱ्या पारितोषिकातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक हे पारितोषिक तर आठवले यांना मिळालेच पण सर्वोत्कृष्ट संकलन इत्यादी दहाहून अधिक तांत्रिक अंगांची पारितोषिकेही या चित्राने मिळवली.

यातील खास ग्रामिण बाजाच्या गाण्यांसाठी आठवले यांनी प्राध्यापक आनंद यादव यांना बोलावले. आठवले यांनी एकच गाणे लिहिले. 'श्रावणा बाळा पाणी आण' हे सुधीर फडके यांच्या आवाजातील गाणे राम कदम यांनी अतिशय परिणामकारक रीतीने स्वरबद्ध केले आहे. ते ऐकले आणि पहिले पाहिजे असेच आहे.

## चित्रपट - वावटळ

### श्रावणा बाळा पाणी आण

जवळी आहे स्वच्छ सरोवर
इथे विसावा घेऊ घडीभर
सुकले अमुचे कंठ तृषेने
जल हे अमृतपान
श्रावणा बाळा पाणी आण.

कमंडलूते घेउनी हाती
बाळ पातला पाण्यापाशी
अरण्यात त्या क्षणात घुमले
जललहरींचे गान
श्रावणा बाळा पाणी आण.

आले श्वापद जल प्राशना
समजुनी ऐसे दशरथ राणा
अंधारातच अचूक सोडी
अमोघ अपुला बाण
श्रावणा बाळा पाणी आण.

फुटला टाहो आई आई
दाही दिशांना भेदुनी जाई
श्वापद म्हणुनी दशरथ मारी
ब्राम्हण पुत्र अजाण
श्रावणा बाळा पाणी आण.

तृषार्त माझे बाबा आई
पाणी त्यांना आधी देई
भ्रांत दशरथा विनवी श्रावण
कुडीत कोंडून प्राण
भ्रांत दशरथा विनवी श्रावण
कुडीत कोंडून प्राण
श्रावणा बाळा पाणी आण.